आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१४ मे २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारकडून साखरेच्या निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी

- उष्णतेच्या लाटेमुळे होणारे मृत्यू शून्यावर आणण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न

- राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार

- केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांच्या नावाची काँग्रेसकडून घोषणा

- ब्रिक्स देशांच्या परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांच्या परिषदेला नवी दिल्लीत सुरुवात

आणि

- अमेरिका आणि चीनच्या अध्यक्षांच्या दरम्यान बीजिंगमध्ये चर्चा

**<><><><><>**

केंद्र सरकारनं साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली असून यामध्ये कच्च्या, पांढऱ्या आणि शुद्ध साखरेचा समावेश आहे, ही बंदी तात्काळ प्रभावानं सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील सूचना येईपर्यंत लागू असेल. साखरेचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणं आणि स्थानिक किमतींवर नियंत्रण ठेवणं हा यामागचा उद्देश आहे. मात्र युरोपियन युनिअन आणि अमेरिकेसाठी काही विशिष्ट कोट्याकरता अपवाद असून केवळ त्यासाठी साखरेची निर्यात केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सध्या प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत असलेल्या मालाला देखील यातून सूट देण्यात आली आहे.

**<><><><><>**

येणाऱ्या काळात देशात उष्णतेच्या लाटेमुळे एकही जीव जाऊ नये यासाठी सरकार योजना आखत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. गाझियाबाद इथं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ध्वज प्रदान कार्यक्रमात ते आज बोलत होते. पूर, चक्रीवादळ, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीवेळी जीवितहानी बिलकूल होऊ नये आणि मालमत्तेचं नुकसान कमीत कमी व्हावं हे सरकारचं उद्दिष्ट आहे. उष्णतेच्या लाटेचं देशासमोर

गंभीर आव्हान असून याचा सामना करण्यासाठी गृहमंत्रालय सज्ज आहे, येणाऱ्या काळात यामुळे होणारी जीवितहानी शून्यावर आणण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे, असं शहा म्हणाले.

**होल्ड बाईट शहा**

**<><><><><>**

राज्यात मतदार यादीच्या SIR अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज १६ राज्य आणि ३ केंद्र शासित प्रदेशातल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यात ३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान हरकती दाखल करता येतील. या हरकतींवर ३ ऑक्टोबरपर्यंत सुनावणी होऊन निकाल दिले जातील आणि ७ ऑक्टोबरला राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १ ऑक्टोबरपर्यंत वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावं या मतदार यादीत समाविष्ट होतील. राज्यात सध्या ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांची नोंद आहे.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नेमणूक करणाऱ्या समितीत केंद्रीय मंत्र्याचा समावेश कऱण्याच्या सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. निवडणूक आयुक्त अधिनियम २०२३ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरली सुनावणी आज न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर झाली. मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीत प्रधानमंत्री, विरोधी पक्षनेते आणि एका केंद्रीय मंत्र्याचा समावेश केला गेला आहे. या समितीत केंद्रीय मंत्र्याचा समावेश करण्यामागे काय कारण आहे, असा प्रश्न न्यायालयाने विचारला. समितीतली तिसरी व्यक्ती ही तटस्थ असायला हवी, ही समिती स्वतंत्र असायला हवी असं न्यायालयाने या सुनावणीवेळी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरमधून एका निवृत्त प्राध्यापकालाही अटक केली आहे. पी. व्ही. कुलकर्णी लातूरच्या दयानंद महाविद्यालयात कार्यरत होते. नीट परीक्षेचा रसायनशास्त्राचा पेपर तयार करण्याच्या प्रक्रियेत ते सहभागी होते. सीबीआयनं ही अटक केली आहे.
याप्रकरणी पुण्यातून एका महिला आणि एका विद्यार्थ्याला अटक झाली आहे. नीटच्या पेपरची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्याला शोधणं, त्याच्याकडून पैसे घेणं आणि त्याला पेपर विकणाऱ्या दलालापर्यंत पोहोचवणं ही कामं हे दोघं करत असल्याचा त्यांच्यावर संशय आहे.

याप्रकरणातल्या इतर ५ आरोपींना दिल्लीतल्या न्यायालयानं ५ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

<><><><><>

केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांचं नाव निश्चित झालं आहे. काँग्रेसने आज नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीपा दासमुन्शी, मुकुल वासनिक आणि अजय माकन यांनी सतीशन यांच्या नावाची घोषणा केली. कोची जिल्ह्याचे मूळ रहिवासी असलेले सतीशन २००१ मध्ये परवूर मतदारसंघातून केरळच्या विधानसभेवर आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून आले होते. २०२१मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेस प्रणित यूडीएफच्या पराभवानंतर सतीशन यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली होती.

<><><><><>

उत्तर प्रदेशात वादळी पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये काल ८९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५३पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे राज्यभरात धुळीचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. धुळीचं वादळ आणि गारपिटीमुळे भिंत कोसळणं, झाडं किंवा विद्युत खांब अंगावर पडून लोक मृत्युमुखी पडले. सर्वाधिक मृत्यू वीज पडण्याच्या घटनांमुळे झाले आहेत. प्रयागराजमध्ये १७ जणांचा मृत्यू झाला. तर भदोही जिल्ह्यात १६ जण, मिर्झापूरमध्ये १०, फतेहपूरमध्ये ९, बदायूमधे ५ तर बरेली जिल्ह्यात ४ जण दगावले आहेत.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी दिसून आली. दूरसंचार, औषधी आणि खासगी बँकांच्या समभागांमध्ये खरेदी झाल्यानं ही तेजी दिसून आली. सेन्सेक्समध्ये आज

दिवसअखेर ७९० अंकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ३९९ अंकावर बंद झाला. निफ्टीही २७७ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ६९० अंकांवर बंद झाला. रुपयाची कमजोरी थांबवण्यासाठी सरकारनं योजलेल्या काही उपाययोजनांमुळंही बाजारात तेजी दिसून आली.

दरम्यान, महानगर गॅसनं मुंबईत सीएनजीचे दर २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून नवीन दर लागू झाले असून १ किलो सीएनजीसाठी आता ८४ रुपये मोजावे लागतील. पीएनजीच्या दरात कुठलाही बदल झालेला नाही.

**<><><><><>**

देशातला घाऊक किंमतीवर आधारित चलनवाढीचा निर्देशांक एप्रिल अखेर ४२ महिन्यातल्या उच्चांकी, ८ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांवर पोहोचला आहे. मार्च महिन्यात हा निर्देशांक ३ पूर्णांक ८८ दशांश टक्के होता. खनिज तेल, पेट्रोलियम पदार्थ, नैसर्गिक वायू, धातू आणि खाद्यान्नाच्या व्यतिरीक्त इतर वस्तूंच्या किंमती वाढल्यानं या निर्देशांकात ही वाढ झाली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून  ब्रिक्स देशांच्या परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांच्या परिषदेत उपस्थित असणाऱ्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भेट घेतली. रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्गेई लावरोव, इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागची, दक्षिण आफ्रिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री रोनाल्ड लामोला आणि ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मौरो विएरा यांची भेट घेत प्रधानमंत्र्यांनी चर्चा केली.

त्याआधी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी प्रस्तावनापर भाषण केलं. शांतता आणि सुरक्षितता हे कायमच जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहतील असं परराष्ट्र व्यवहारमंत्री यावेळी म्हणाले. या बैठकीचं अध्यक्षस्थान  डॉ. एस. जयशंकर यांनी भूषवलं. जगात सध्या सुरु असलेल्या  संघर्षांमुळे संवाद आणि कूटनीतीचं महत्त्व अधोरेखित होतं, दहशतवादाविरुद्ध सहकार्य मजबूत करण्याचीही सामायिक गरज आहे, असं ते म्हणाले.

या गुंतागुंतीच्या आणि अस्थिर जागतिक परिस्थितीत शाश्वत विकासाला पुढे नेणारा संवाद असावा तसंच समान मात्र  भिन्न जबाबदाऱ्यांच्या तत्त्वांचं  पालन केलं जावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

भारतीय जहाजावर ओमानच्या समुद्र किनाऱ्याजवळ काल झालेल्या हल्ल्याचा भारताने निषेध केला आहे. व्यावसायिक जहाज आणि खलाशांना लक्ष्य केलं जात असल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी एका निवेदनाद्वारे नापसंती व्यक्त केली आहे. या जहाजावरचे सर्व कर्मचारी सुरक्षित असून त्यांना मदत केल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने ओमानचे आभार मानले आहेत.

<><><><><>

चीन आणि अमेरिका यांच्यात नवे रचनात्मक द्विपक्षीय संबंध निर्माण करण्यावर दोन्ही देश सहमत आहेत, मात्र तैवान प्रश्नावरून तणाव निर्माण झाला तर संबंध खराब होऊ शकतात असा इशारा चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपींग यांनी दिला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आज झालेल्या भेटीनंतर जिनपींग यांनी हे विधान केल्याचं वृत्त चीनच्या सरकारी वृत्तसंस्थेनं दिलं आहे.

तैवानच्या प्रश्न चीन- अमेरिका संबंधात अतिशय महत्त्वाचा आहे, हा प्रश्न नीट हाताळला गेला तर दोन्ही देशांच्या संबंधात स्थिरता येईल, नाहीतर संघर्ष उद्भवू शकतो असं जिनपींग म्हणाले. गेल्या ९ वर्षातली अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचा हा पहिलाच चीन दौरा आहे. २०१७ मधे डोनाल्ड ट्रम्प यांनीच त्यांच्या पहिल्या कार्यकाळात चीनला भेट दिली होती.

//<><><><><>//